ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख ७ डिसेंबर, १९६० अंक ४४

## विविध माहिती

**आर्थिक तज्ज्ञांचा दौरा**—ब्रिटनमधील पांच वृत्तपत्रांचे आर्थिक विषयांचे संपादक भारताचा दौरा करण्यासाठी आले आहेत. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारतानें केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचें मूल्यमापन ते करणार आहेत. ह्या कामासाठी खाजगी सार्वजनिक विभागांतील प्रमुख व्यक्तींच्या मुलाखती ते घेतील.

**यांत्रिक हत्यारांची मागणी**—ब्रिटनमधील डेव्हिड ब्राऊन कॉर्पोरेशनचे उप-मॅनेजिंग डायरेक्टर नुकतेंच रशिआचा दौरा करून आले. रशिआनें ब्रिटनकडून ५ लाख पौंड किंमतीच्या अद्यावत् यांत्रिक हत्यारांची मागणी केली असून आणखी तितक्याच किंमतीची मागणी रशिआकडून येण्याचा संभव आहे असें त्यांनीं सांगितलें.

**फ्रान्सचा तिसरा अणुबाँब**—आपल्या ताब्यांतील सहारा वाळवंटांत फ्रान्स लवकरच आपल्या तिसऱ्या अणुबाँबचा स्फोट करणार आहे. फ्रेंच अणुशास्त्रज्ञ आतां छोट्या अणुबाँबचा शोध लावण्याचे प्रयत्न करीत असून त्यांना ह्या बाबतींत बरेंच यश मिळाल्याची बोलवा आहे. तिसरा स्फोट अंतराळांत करण्यांत येईल.

**रशिअन तेलाची विक्री**—रशिआंतून आयात केलेल्या केरोसीन तेलाची विक्री गुजरात राज्यांत १ जानेवारीपासून सुरू करण्यांत येणार आहे. राज्यांतील चार जिल्ह्यांत तेलाचें वांटप करण्याचें काम गुजरात को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीतर्फे करण्यांत येणार आहे. तेलाची किंमत अद्याप ठरली नसली तरी ती तेलकंपन्यांशीं स्पर्धा करणारी असेल, असें म्हणतात.

**साखरेसाठी नवी बाजारपेठ**—अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांनीं लोकसभेंत असें सांगितलें कीं, आंतरराष्ट्रीय साखर परिषदेच्या सभासद होण्याचे प्रयत्न भारत करीत आहे. अमेरिकेंत बाजारपेठ मिळविण्यासाठी परिषदेच्या सभासदत्वाची जरूर आहे. कारण अमेरिकेंत साखरेच्या किंमती आंतरराष्ट्रीय किंमतीपेक्षा अधिक आहेत असें त्यांचें म्हणणें आहे.

**तिबेटमधील निराश्रितांची व्यवस्था**—तिबेटमधून आलेल्या ३,००० निर्वासितांची म्हैसूर राज्यांत सोय करण्यांत येणार असल्याची माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. हे लोक लवकरच म्हैसूर राज्यांत येतील. निर्वासितांच्या प्रत्येक ५ माणसांच्या कुटुंबाला ५ एकर जमीन कसण्यासाठी देण्यांत येणार आहे.

**खताच्या वांटपाची व्यवस्था**—१ जानेवारी, १९६१ पासून राज्यांतील रासायनिक खताच्या वांटपाची व्यवस्था स्टेट मार्केटिंग सोसायटीकडे सोंपविण्याचें गुजरात सरकारनें ठरविलें आहे. जिल्हानिहाय खरेदी-विक्री संघामार्फत सोसायटी खताचें वांटप करील. त्याबद्दल सोसायटीला ठराविक दरानें कमिशन मिळेल. सुमारें ३ कोटी रुपयांच्या खताचें वांटप अशा रीतीनें करण्यांत येईल.

**इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला कर्ज**—अमेरिकेच्या विकास-निधि-फंडांतून भारताच्या इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशनला २ कोटी डॉलर्स म्हणजे सुमारें १० कोटी रुपयांचें कर्ज लवकरच मिळणार आहे. कॉर्पोरेशनला ह्या पूर्वी १ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळालेलें असून खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांत त्याचें वांटप करण्यांत येत आहे.

**ब्रिटिश शास्त्रज्ञांचें यश**—ब्रिटिश वैद्यक शास्त्रज्ञांनीं सर्दीवर एक प्रभावी लस शोधून काढली आहे. गेल्या हिंवाळ्यांत ब्रिटनमधील हजारों नागरिकांनीं इन्फ्लुएंझाविरुद्ध टोंचून घेतलें. ह्यांपैकी पुष्काळ लोकांना फार थोड्या वेळां सर्दीची बाधा झाली. कांहींना तर मुळींच झाली नाहीं. ह्या अनुभवांतून शास्त्रज्ञांना शोधाची वाट सांपडली.

**चहाची निर्यात बंद**—पाकिस्तानांत चहाचा तुटवडा जाणवूं लागल्यामुळें पाकिस्तान सरकारनें चहाची निर्यात बंद केली आहे. पाकिस्तानांत दरसाल सुमारें ५-७ कोटी पौंड चहाचें उत्पादन होतें व त्यांतील ४ कोटी पौंड चहा देशांतच खपतो. नुकत्याच झालेल्या वादळामुळें पाकिस्तानचें चहाचें उत्पादन बरेंच घटलें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सहकारावरील पुस्तकांसाठी पारितोषिक

### भारत सरकारी योजना

सहकारी चळवळीच्या महत्त्वाच्या अंगांचा परामर्ष घेणारीं पुस्तकें आणि वाङ्मय तयार करण्यास उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारच्या समाज विकास आणि सहकार खात्यानें लेखकांना पारितोषिकें देण्याची आणि विशिष्ट विषयावरील पुस्तकांचा 'कॉपीराइट' खरेदी करण्याची योजना आंखली आहे. हीं पुस्तकें सहकार क्षेत्रांतील कार्यकर्ते, सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि या क्षेत्रांत रस घेणाऱ्या व्यक्ति यांच्या उपयोगी पडावी अशी कल्पना आहे.

या दृष्टीनें पुढील विषय सुचविण्यांत आले आहेत :—(१) सहकारी शेती, (२) सहकारी खरेदी–विक्री (मार्केटिंग) संस्थेचे कारभार, (३) खेड्यांतील सहकारी संस्थेची कार्यपद्धति आणि हिशेबपद्धति, (४) ग्राहक सहकारी संस्था, (५) ग्रामसेवकासाठी सहकार मार्गदर्शक, (६) यशस्वी सहकारी संस्थांच्या कथा, आणि (७) सहकारी पतपद्धतीचे फायदे स्पष्ट करणारे नाटक.

पुस्तकें स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३१ मार्च १९६१ आहे. या योजनेंत सहभागी होऊं इच्छिणाऱ्या लेखकांनीं सेक्शन ऑफिसर, (को–ऑपरेशन ट्रेनिंग), मिनिस्ट्री ऑफ कम्युनिटी डेव्हलपमेंट अँड को–ऑपरेशन, डिपार्टमेंट ऑफ को–ऑपरेशन, खोली क्र. ४६५–ए कृषि भवन, नवी दिल्ली यांच्याकडून यासंबंधीची अधिक माहिती मागवावी.

---

### बँक ऑफ विकानेर आणि बँक ऑफ जयपूरच्या भागदारकांना नुकसानभरपाई

सन १९५९ च्या स्टेट बँक ऑफ इंडिया (सब्सिडिअरी बँक्स) ॲक्टांतील तरतुदींनुसार बँक ऑफ विकानेर लि. आणि बँक ऑफ जयपूर लि. या बँकांच्या नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असलेल्या भागधारकांना नुकसानभरपाईच्या रकमेबाबत न्याय-मंडळाकडे बाजू मांडावयाची असेल तर ते विनंती अर्ज पाठविण्यासाठी भारत सरकारनें सदर कायद्यांतील १३ (३) कलमान्वयें दोन्ही बँकांच्या बाबतीत २६ डिसेंबर, १९६० पर्यंत मुदत दिली असल्याचा हुकूम काढला आहे. हे लेखी विनंती अर्ज ठराविक फॉर्ममध्यें सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, डिपार्टमेंट ऑफ एकॉनॉमिक अफेअर्स, स्टेट बँक्स सेक्शन, नवी दिल्ली या पत्त्यावर पाठवावेत. संबंधित स्टेट बँकांच्या प्रमुख कचेऱ्यांकडे या फॉर्मच्या प्रती मिळूं शकतील.

### हातमागी कापडाचें उत्पादन : पद्धतशीर पाहणी चालू

देशांतील कापडधंद्यांत हातमागांवर व वीजमागांवर होणाऱ्या कापडाच्या उत्पादनासंबंधीं विश्वासार्ह माहिती मिळविण्यासाठी देशभर उपाय योजण्यांत येत आहेत.

तदनुसार हातमाग विभागांतील उत्पादनाचा अंदाज घेण्यासाठी सहा राज्यांत आंकडेवारीवर आधारित अशी नमुनापाहणी यापूर्वीच सुरू झाली असून इतर राज्यांतहि ही पाहणी लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे. अखिल भारतीय हातमाग मंडळानें या प्रश्नाचा सांगोपांग विचार केला असून या पाहणीकार्यासाठी राज्य सरकारांस आर्थिक साह्य देण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. हातमागी उत्पादन प्रामुख्यानें विणकर कुटुंबांतून होत असून, हातमाग धंद्यासारख्या प्रचंड प्रमाणावरील विकेंद्रित धंद्यांतील उत्पादनाचा अंदाज घेतांना उद्भवणाऱ्या अटळ अशा प्रत्यक्ष प्रश्नांचा परामर्ष घेणें हा या पाहणी–कार्यांतील हेतु आहे.

भारतांतील हातमागी कापडाचें एकूण अंदाजें उत्पादन सुमारें १९० कोटी वार आहे. हें उत्पादन करणाऱ्या मागांची संख्या सुमारें २२·८ लाख असून प्रत्येक मागावर प्रतिवर्षी सुमारें ८३० वार कापड काढण्यांत येतें. तथापि मद्रास राज्यांत गेलीं दोन वर्षे चालू असलेल्या पाहणीवरून प्रत्यक्षांतील हा आंकडा किती तरी जास्त असल्याचें आढळून आलें आहे. या राज्यांत दर मागामागें १२०० वार कापडाचें उत्पादन होत असल्याचें दिसून आलें आहे. या राज्यांत १९५८–५९ व १९५९–६० मध्यें अनुक्रमें ६२·२ कोटी वार व ५३·२ कोटी वार हातमागी कापड तयार झालें आहे. मद्रास राज्यांतील या पाहणीवरून, हातमागी कापडाच्या देशांतील एकूण उत्पादनाचा अंदाज कोठल्याहि प्रकारें अवास्तविक नाहीं हें सिद्ध होत आहे.

देशांतील सुती कापडाचें उत्पादन करणाऱ्या अनधिकृत वीजमागांची संख्या सुमारें १८००० असल्याचें दिसून आलें आहे. भारत सरकारनें या अनधिकृत मागांसाठी परवाने देण्याचा निर्णय कांहीं दिवसांपूर्वी घेतला असून ते दिल्यानंतर देशांतील वीज-मागांचा निश्चित आंकडा स्पष्ट होईल.

---

**जुन्या चित्रपटांचें जतन**—जुन्या चित्रपटांचें जतन करणाऱ्या नॅशनल फिल्म आर्काइव्हज ह्या संस्थेला एका ब्रिटिश दिग्दर्शकानें १९०१ सालीं घेतलेला चित्रपट दिला आहे. चित्रपटांत एक शीख पलटण कवाईत करीत असल्याचें चित्रण आहे. ह्याच दिग्दर्शकानें १८९८ सालीं कलकत्त्यांतील दृश्यांचा घेतलेला चित्रपट पं. नेहरूंना दिला आहे. हा चित्रपट सिनेमाचा शोध लागल्यावर ३ वर्षांनीं घेतलेला आहे.


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८] गिरगांव, मुंबई ४. [टेलि. : ७०१४

**महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक**

| | |
|---|---|
| भाग भांडवल : ... ... | रु. ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : ... ... | रु. ९,७३,००० |
| ठेवी : ... ... | रु. १,३१,००,००० |
| खेळतें भांडवल : ... ... | रु. १,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

मध्यवर्ती शाखा : **सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

# अर्थ

बुधवार, ता. ७ डिसेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिमेंटची किंमत वाढवून देण्याची मागणी

म्हैसूर सिमेंट्स लि., ह्या कंपनीनें बंगलोरपासून ७५ मैलांवर सिमेंट तयार करण्याचा कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्याच्या कचेरीच्या इमारतीच्या पायाचा दगड भारताचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांच्या हस्तें बसविण्यांत आला. संकल्पित कारखाना खाजगी मालकीच्या विभागांतील असून तो उभारण्याच्या कामीं अमेरिकेच्या कैसर औद्योगिक संघटनेनें सहकार्य केलें आहे. कारखान्याची प्रारंभींची उत्पादनक्षमता दरसाल १ लाख टन सिमेंट तयार करण्याची असेल. परंतु उत्पादनक्षमता दुप्पट करण्याची सोय मुद्दाम करण्यांत येणार आहे. कैसर औद्योगिक संघटनेंचें सहकार्य लाभल्यामुळें अमेरिकेच्या विकास–निधि–फंडांतून ६५ लाख रुपयांचें परदेशीय चलन मिळण्याची अपेक्षा करण्यांत येत आहे. त्याशिवाय अमेरिकेच्या इंपोर्ट–एक्सपोर्ट बँकेकडून आणखी ५५ लाख रुपयांचें कर्जहि मिळण्याची शक्यता आहे. प्रथमतः हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येणार होता. परंतु नंतर तो खाजगी मालकीच्या विभागांत काढण्याचें ठरलें. दोन वर्षांपूर्वी भारतांत सिमेंटचें उत्पादन वाजवीपेक्षा अधिक होऊन तें पडून राहील अशी भीति व्यक्त करण्यांत येत होती. पण अनुभवानें ही भीति व्यर्थ ठरली आहे. सिमेंटला येणारी मागणी सारखी वाढतच चालली असून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील १·५ कोटी टनांचें उद्दिष्ट गांठण्यांत आलें तरीहि देशाची गरज पूर्णपणें न भागण्याचा संभव आहे.

म्हैसूरमधील ह्या नव्या कंपनीचें स्वागत करतांना श्री. लालबहादुर शास्त्री म्हणाले कीं सिमेंटच्या धंद्यांतील कामगारांच्या वेतनासंबंधीं नेमण्यांत आलेल्या बोर्डानें आपल्या शिफारशी केलेल्या आहेत. शिफारशी केल्यापासून सिमेंटच्या कारखान्यांनींहि सिमेंटची किंमत वाढवून देण्याचा आग्रह चालविला आहे. सिमेंटच्या उद्योगधंद्यांशीं संबंध असलेल्यांच्या सर्व मागण्यांचा विचार करून सरकारनें सिमेंटच्या किंमतीचा प्रश्न आतां टॅरिफ कमिशनकडे सोंपविण्याचें ठरविलें आहे. सिमेंट-वेतन-बोर्डाच्या शिफारशी मुळें सिमेंटच्या किंमती साहजिकच वाढल्या आहेत. त्यामुळें सिमेंटच्या किंमती वाढवून देण्याची मागणी कारखान्यांतर्फे करण्यांत येत आहे. पण, सिमेंट ही एक रोजखपाची वस्तु असल्यामुळें सरकारला किंमतवाढीच्या मागणीला मान्यता देतां आली नाहीं. म्हणून स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें जादा वाढलेली किंमत सोसण्याचें ठरविलें आणि सिमेंटच्या उद्योगधंद्याला अडचणींतून वांचविलें. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनची ही कामगिरी लक्षांत ठेवण्यासारखी आहे. भारतामधील सिमेंटची मागणी एकसारखी वाढत चाललेली आहे. सिमेंटच्या कारखान्यांनीं ही मागणी पुरविण्याची पराकाष्ठा करणें अगत्याचें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिमेंटच्या उत्पादनाचें जें उद्दिष्ट ठरविण्यात आलें होतें तें गांठण्यांत सिमेंट कारखान्यांना अद्याप यश आलेलें नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट कारखान्यांनीं गाठलें तर देशांतील सिमेंटच्या उत्पादनाचा प्रश्न बऱ्याच प्रमाणांत सुटल्यासारखा होईल.

## संयुक्त आयुर्विम्याबाबत नवे निर्बंध

आयुर्विमा कॉर्पोरेशननें कांहीं विशिष्ट स्त्रियांच्या आयुर्विम्याच्या बाबतींत निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें पतिपत्नींचा संयुक्त आयुर्विमा स्वीकारण्याचेंहि बंद केलें आहे. संयुक्त विम्याची योजना जे नवराबायको धंद्यांत भागीदार असतील त्यांच्याच पुरती मर्यादित करण्यांत आली आहे. स्त्रियांच्या जीविताच्या जोखमीवर देण्यांत येणाऱ्या विमापत्रकाचा आंकडेवार अभ्यास करण्याचें काम कॉर्पोरेशननें सुरू केलें आहे. ह्या बाबतींत सध्यां जे आंकडे उपलब्ध आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, १९५९ साली कॉर्पोरेशननें विम्याचा जो एकूण धंदा केला त्यांपैकीं ११·३८ टक्के धंदा पतिपत्नींच्या अगर स्त्री-पुरुषांच्या संयुक्त विम्याचा होता. ह्या विमापत्रकांची दर्शनी किंमत ४७·५३ कोटी रुपये होती. ह्या पूर्वीपासूनच संयुक्त विमापत्रकांची संख्या वाढत चाललेली होती. १९५६–५७ सालांत संयुक्त विमापत्रकांची दर्शनी किंमत १६·२१ कोटी होती, व १९५७–५८ सालीं ती ३२·७० कोटी होती, ह्यावरूनच संयुक्त विमापत्रकांची संख्या वाढत चालली असल्याचें स्पष्ट होतें. ह्यासंबंधी जे आंकडे गोळा करण्यांत आले आहेत त्यावरून, पुष्कळशा संयुक्त विमापत्रकांतील स्त्रीच्या जीवितावर विमा घेण्याचें कांही कारण नव्हतें असें आढळून आलें आहे. संयुक्त विमापत्रकांपैकीं बरींच विमापत्रकें केवळ सट्ट्यांच्या मनोवृत्तीनें घेतलेली आढळलीं. असे विमे घेणें म्हणजे विम्याच्या तत्त्वाचा अधिक्षेप केल्यासारखें आहे. ज्या स्त्रिया स्वतंत्रपणें मिळवत्या असतील त्यांच्या बाबतींत मात्र पूर्वीप्रमाणेंच विमापत्रकें देण्यांत येतील.

## बँक ऑफ नागपूरचें महाराष्ट्र बँकेंत विलीनीकरणाचा विचार

भारत सरकारनें रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीवरून, नुकत्याच दुरुस्त केलेल्या बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या ४५ व्या कलमानुसार नागपूर येथील बँक ऑफ नागपूर लिमिटेडला ऋणमुक्त होण्यासाठी २७ नोव्हेंबर १९६० पासून ८ जानेवारी १९६१ पर्यंत (दोनहि दिवस धरून) अवधि दिला आहे.

या बँकेची पुनर्रचना करून ती बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेडमध्यें विलीन करण्याच्या प्रश्नावर रिझर्व्ह बँक विचार करीत असून या बँकेच्या ठेवीदारांचे हितसंबंध विचारांत घेऊन आणि ही संकल्पित पुनर्रचना व विलीनीकरण करणें सुलभ जावें म्हणून सदर अवधि देण्यांत आला आहे. हें विलीनीकरण झाल्यास या बँकेच्या लवकर जमा होणाऱ्या पैशांतून बहुसंख्य ठेवीदारांस तावडतोब पैसे मिळूं शकतील. तदनंतर जसजसे अधिक येणें वसूल होईल तसतशा ठेवीदारांस अधिक रकमा देण्यांत येतील.

## सहकारी बिलांत सहकारी तत्त्वांचीच डावलणूक

महाराष्ट्र राज्य विधानसभेंत दि. १८ नोव्हेंबर रोजीं सहकार-मंत्री श्री. भारदे ह्यांनीं महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज बिल मांडलें, त्यावर बरीच उलटसुलट चर्चा झाली. त्या चर्चेला उत्तर देतेवेळीं, सहकार मंत्र्यांनीं त्यांचेकडे श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनीं पाठविलेल्या सूचनांचा उल्लेख केला. ह्या सूचनांचा सिलेक्ट कमिटी विचार करील, असें त्यांनीं सभागृहास सांगितलें. ह्याचा अर्थ, इतक्या महत्त्वाच्या बिलाचे बाबतींत सरकारनें महाराष्ट्र राज्यांतील सहकारविषयाचे तज्ज्ञ व अनुभवी नेते, श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांचा आधीं सल्ला घेतला नसावा असें दिसून येतें. श्री. मेहता यांनीं महत्त्वाच्या कांहीं बाबतींत केलेल्या सूचना आम्हीं येथें देत आहों.

**कलम २ : व्याख्या**

(१) १९२५ सालीं, नोंदणीसाठी सोसायट्यांचें वर्गीकरण करण्याची पद्धत सुरू करण्यांत आली, तेव्हांपासून आतांपर्यंत कोणत्या वर्गांत कोणती सोसायटी घालायची हें ठरविण्याचे बाबतींत कायद्याची अंमलबजावणी करणारांना अडचण वाटली, हें विधान मला मान्य नाहीं. सोसायटीचे उत्पादक कोणत्या उद्देशानें एकत्र येतात, हें वर्गीकरण दिग्दर्शित करतें. विचारांचा आणि हितसंबंधाचा गोंधळ थांबविण्यासाठी हें आवश्यक असून, तें कायम रहावें असें मला वाटतें.

**कलम ७२ : सोसायटीचा अंतिम अधिकार**

**कलम १४ : कानूंची दुरुस्ती करण्यास लावण्याचा अधिकार**

(२) सहकारी चळवळीमध्यें, अधिकाऱ्यांनीं सोसायटीला विशिष्ट कानू मंजूर करण्यास किंवा कानूला दुरुस्ती करण्यास लावायला प्रयत्न करण्यास वारंवार आक्षेप घेण्यांत आलेला आहे. अंतिम अधिकार साधारण सभेचा आहे. मध्यवर्ती सरकारच्या खात्याचा ह्या योजनेला विरोध आहे; प्रस्तुत योजना बिलांतून वगळण्यांत यावी, असें मी आग्रहपूर्वक सांगेन.

**कलम २३ : खुलें सभासदत्व**

(३) सध्यांच्या नियमांत, ज्याला विशिष्ट सोसायटींत सभासदत्व नाकारलें असेल त्याला अपील करण्याचा अधिकार आहे. हें अपील बॉम्बे स्टेट को. युनियनकडे करावयाचें असतें. आतां करण्यांत येत असलेल्या तरतुदींत हें अपील रजिस्ट्रारकडे करावयाचें आहे. जुन्या मुंबई राज्यांत आपण फेडरल घटकांना मान्यता देण्याच्या प्रवृत्तीस प्रोत्साहन देत आलों आहों, त्याच्याशीं ही तरतूद विसंगत आहे.

**कलम २८ : भागधारणेवर बंधन**

(४) सध्यांच्या भागधारणेच्या कमाल मर्यादेचा कांहीं दुरुपयोग झाला असल्याचें मला तरी माहीत नाहीं. ती मर्यादा ठरविण्यांत आल्यानंतर चलनाची किंमत बदलली आहे. तेव्हां ती मर्यादा खाली उतरविण्यास समर्थनीय कारण मला दिसत नाहीं.

**कलम ३५ : सभासदत्व रद्द करणें**

(५) सोसायटींतील अनिष्ट लोकांना काढून टाकण्याची तरतूद कायद्यांत असणें उपयुक्त ठरेल. सोसायट्यांच्या कानूंत तशी तरतूद असते. कायद्यांतच तशी तरतूद करावयाची असल्यास, अपिलाचा आणि पुनर्विचाराचा अधिकार फेडरल घटकाला देण्यांत यावा.

**कलम ६७ : डिव्हिडंडवर मर्यादा**

(६) सहकारी चळवळ प्रगत झालेल्या सर्व देशांतून, भागांवर माफक डिव्हिडंड आणि उर्वरित रकमेचा रिझर्व्ह, शैक्षणिक किंवा सार्वजनिक गोष्टींकडे विनियोग अथवा सभासदांना रिबेट वा बोनस, अशी तरतूद असते. ह्या प्रवृत्तीच्या उलट दिशेनें जाणें अनिष्ट होईल. डिव्हिडंडवरील सध्यांचीच मर्यादा कायम राखण्यांत यावी.

**कलम ७३ : सोसायटी रद्द करणें**

(७) आतां ४८ व्या नियमांत सोसायटी रद्द करण्याची तरतूद करण्यांत येत आहे. फिनॅन्सिंग एजन्सीज, बँका, ह्यांचा सल्ला घेण्याची त्यांत व्यवस्था आहे. पण जेव्हां एखाद्या सोसायटीला बँकेनें कर्जपुरवठा केलेला नसेल, तर ब्लॉक, तालुका किंवा जिल्हा को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग एजन्सीशीं विचारविनिमय करायला काय हरकत आहे, ह्याचा विचार व्हावा.

**कलम ९१ : सोसायटीच्या कारभारावर देखरेखीसाठी संघटना**

(८) सुपरव्हिजनचें काम वास्तविक फेडरल एजन्सीजचें; त्यांनाच फक्त त्यासाठी मान्यता देण्यांत यावी. देखरेखीसाठीच नव्या एजन्सीज निर्माण करण्याचा अधिकार सरकारला देणें अयोग्य होईल.

**कलम ९५ : तंटे मिटविण्याची व्यवस्था आणि रजिस्ट्रार, त्याचे नॉमिनी किंवा बोर्ड ऑफ नॉमिनीज ह्यांचा अधिकार**

(९) आर्बिट्रेशन किंवा अपील ह्यांचे वेळीं वकिलांना मज्जाव करणें, ही चांगली पद्धत आहे. तेव्हां, सर्वत्र भारतभर अंमलांत असलेली ही पद्धत कायम ठेवावी.

**कलम १११ : सरप्लस जिंदगीची विल्हेवाट**

(१०) सोसायटीची जिंदगी ही सर्वांची मिळून आहे, हें सहकाराचें एक आद्य तत्त्व आहे; जॉइंट स्टॉक पद्धतीपेक्षा सहकारी पद्धत श्रेष्ठ असण्याचें तें एक प्रमुख कारण आहे. ह्या तत्त्वाला बाधक होईल अशी कोणतीहि गोष्ट संपूर्णतः अप्रस्तुत आणि अयोग्य, असेंच मी मानतों.

श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनीं बिल वाचून तातडीनें केलेल्या सूचनांचा मथितार्थ वरीलप्रमाणें आहे. रजिस्ट्रारला बिलानें देण्यांत येत असलेले अमर्याद अधिकार आणि त्यामुळें सहकारी चळवळीवर येणारीं नियंत्रणें, ह्यांचा तपशीलवार विचार करून को-ऑपरेटिव्ह युनियन आपलें निवेदन सहकार-मंत्र्यांकडे पाठविणार आहे. मध्यवर्ती सरकारची संबंधित खातीं सहकारी चळवळ ही जनतेची चळवळ व्हावी असें वारंवार प्रतिपादन करीत असतांना, महाराष्ट्र राज्य सरकारनें त्याच धोरणानें वागणें श्रेयस्कर आहे. सिलेक्ट कमिटीमध्यें बिलांत आमूलाग्र सुधारणा झाली, तरच ती सहकारी चळवळीमधील कार्यकर्त्यांना प्रोत्साहनकारक होईल. 'सहकार' ह्याचा खरा अर्थ, त्याचीं तत्त्वें, त्याचीं वैशिष्ट्यें, ह्यांच्या सखोल अभ्यासाचे आणि तुलनात्मक व्यासंगाचे अभावीं, सहकाराचें नांवानें सरकारी संघटनाच उभी राहिली जाण्याची भीति आहे. श्री. वैकुंठभाईंनीं ही भीति तीव्र शब्दांत व्यक्त केलेली आहे, असें आम्हांस वाटतें.

---

**राष्ट्रीयीकरण झालेले उद्योगधंदे**—ब्रिटनमधील पुढील निवडणुकांपूर्वी राष्ट्रीयीकरण झालेल्या सर्व उद्योगधंद्यांची तपासणी व जरूर तर पुनर्घटना करण्यांत येणार आहे. प्रथम रेल्वे व नंतर कोळसाखाणी, पोस्ट ऑफिस, विमानवाहतूक, गॅस व वीज अशा क्रमानें ही तपासणी व पुनर्घटना करण्यांत येणार आहे.

## महाराष्ट्र राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशनचें कार्य

### कायदे पुस्तकांत राहिले; नव्यानें चालना

नियंत्रित वखारींच्या वाढीस पोषक ठरेल असा सक्रीय हातभार प्रथम १९४४ सालीं रिझर्व्ह बँकेनें लावला असेंच म्हणावें लागेल. या वर्षी रिझर्व्ह बँकेनें वखारीसंबंधीच्या कायद्याचा मसुदा तयार करून राज्य सरकारांना या मसुद्याच्या धर्तीवर जरूर तो कायदा पास करून घेण्याची विनंती केली. १९४८ पर्यंत बऱ्याच राज्य सरकारांनीं असे कायदे केले नव्हते. १९४८ मध्यें कायद्याच्या मसुद्यांत थोडाफार फरक सुचवून बँकेनें पुन: वखारीबाबत कायदा करण्याची राज्य सरकारांना विनंती केली. रिझर्व्ह बँकेने सुचविलेल्या मसुद्याच्या आधारावर कांहीं राज्यांनीं असे कायदे केले. परंतु कोठेंहि नियंत्रित वखारी न उघडल्या गेल्यामुळें कायदे पुस्तकांतच राहिले. वखारीच्या धंद्याकडे सर्वसाधारण जनता उदासीन राहिली हें याचें मुख्य कारण होतें. तथापि देशामध्यें नियंत्रित वखारी उघडण्याची निर्विवाद जरूरी आहे हें पटल्यामुळें रूरल क्रेडिट सर्व्हेकमिटीनें (१९५१) या कामास चालना व स्थैर्य मिळण्याचे दृष्टीनें मध्यवर्ती वखार संघ व प्रत्येक राज्यामध्यें वखार संघ स्थापन करण्याचें सुचविलें. या वखार संघाच्या शेअर भांडवलामध्यें मोठ्या प्रमाणावर पैसा गुंतविण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट व वेअरहौसिंग बोर्ड स्थापण्याचीहि या कमिटीनें शिफारस केली.

रूरल क्रेडिट सर्व्हे-कमिटीच्या शिफारसीप्रमाणें १९५६ मध्यें नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट व वेअरहौसिंग बोर्ड, मध्यवर्ती वखार संघ व राज्य वखार संघ स्थापन करतां यावेत यासाठी संसदेनें ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस (डेव्हलपमेंट अँण्ड वेअरहौसिंग) कॉर्पोरेशन ॲक्ट १९५६ हा कायदा पास केला. नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट व वेअरहौसिंग बोर्डाचें काम- साधारण-रीत्या सर्व देशांतील सहकारी क्षेत्रांतील प्रगतींत एकसूत्रीपणा आणणें हें आहे. हेंच बोर्ड मध्यवर्ती वखारसंघाच्या शेअर-भांडवलामधील आपला वांटा उचलते.

### वखारींची स्थापना

मध्यवर्ती वखारसंघाची स्थापना २ मार्च १९५७ रोजीं झाली. देशांतील मोठ्या बाजारपेठांत नियंत्रित वखारी सुरू करणें हें या संघाचें काम आहे. आतांपर्यंत मध्यवर्ती वखारसंघानें देशांत २६ बाजारपेठांत आपल्या वखारी सुरू केल्या असून त्यांपैकी ५ वखारी महाराष्ट्र राज्यांत आहेत. तीं ठिकाणें कोल्हापूर, सांगली, अमरावती, अकोला व गोंदिया हीं होत. मुंबई राज्य (आतां महाराष्ट्र राज्य) वखारसंस्था ८ ऑगस्ट १९५७ रोजीं स्थापन झाली. या संस्थेचें अधिकृत भांडवल २ कोटी रुपयांचें असून त्यांपैकी ४० लाख रुपयांचें भांडवल आतांपर्यंत विक्रीस काढलेलें व जमा झालेलें आहे. या शेअर भांडवलापैकी ५० टक्के भांडवल मध्यवर्ती वखार-संस्था व ५० टक्के राज्य सरकार देते. मुंबई राज्य वखार संस्थेनें आतांपर्यंत १८ ठिकाणीं वखारी उघडल्या आहेत. (यांत गुजरातमधील तीन वखारींचा समावेश होतो.) महाराष्ट्र राज्यांत अशा वखारी नंदुरबार, कऱ्हाड, दोंडाईचे, अमळनेर, जळगांव, धुळें, चाळीसगांव, धामणगांव, लासलगांव, जालना, परभणी, परळी-वैजनाथ, लातूर, बार्शी, या ठिकाणीं आहेत. १९६०-६१ सालीं, महाराष्ट्र राज्यांत आणखी १४ ठिकाणीं नवीन वखारी उघडण्याची योजना आहे. त्यासाठी नांदेड, सेलू, सोलापूर, पंढरपूर, कुर्डुवाडी अहमदनगर, औरंगाबाद, शिरपूर, मालेगांव, श्रीरामपूर, धुमसर, पुणें, मानवत व वैजापूर या बाजारपेठांची निवड केलेली आहे. या नवीन वखारींमध्यें एक लाख पोतीं ठेवण्याची सोय होईल. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या सर्व वखारींमध्यें एकूण एक लाख पोतीं ठेवण्याची सोय आहे आणि ती अडीच लाख पोत्यांपर्यंत वाढविण्याची खटपट करण्यांत येत आहे. अशा प्रकारें या वर्षांत राज्य कोठारसंघाच्या सर्व वखारींत एकूण साडेतीन लाख पोतीं ठेवण्याची सोय होईल.

सुरवातीस या वखारी भाड्याच्या गोदामामध्यें सुरू करण्यांत आलेल्या आहेत. पण आतां जळगांव, धुळें, नंदुरबार, बार्शी, कराड, या ठिकाणीं कांहीं महिन्यांच्या अवधींत आणि १९६०-६१ अखेर आणखी आठ ठिकाणीं राज्य वखारसंघाच्या मालकीच्या वखारी बांधण्याचें ठरविलें आहे.

### वखारीचें काम कसें चालतें ?

वखारींत माल ठेवण्यासाठी आणल्यावर वेअरहाउसमन प्रथम मालाचें वजन करतो व त्याची प्रतवारी ठरवितो. आणलेला माल संपूर्णपणें कोरडा आहे व त्यांत कीड नाहीं याबद्दल तो खात्री करून घेतो. वेअरहाउसमन त्यांपैकी कांहीं पोतीं वजन करून पाहतो व जरूर वाटल्यास सर्व पोत्यांचें वजन करतो. मालाचें वजनें व प्रतवारी याबद्दल खात्री करून घेतल्यावर पोत्यांच्या व्यवस्थितपणें थप्प्या लावण्यांत येतात. प्रत्येक व्यक्तीचा माल वेगळा ठेवण्यांत येतो. तसेंच प्रत्येकाच्या मालावर ओळखूं येण्यासाठी खुणा करण्यांत येतात. थप्पींच्या सर्व बाजूंनीं भरपूर जागा सोडण्यांत येते. त्यामुळें मालाची तपासणी करून त्यावर जंतुनाशक औषधें लावणें शक्य होतें. पोत्यांच्या थप्प्या लावण्या अगोदर जमीनीवर बांबूच्या चटया पसरण्यांत येतात. थप्पी लावून झाल्यावर पोत्यावर बी. एन. सी. (डी. ५ टक्के) पावडर किंवा इतर जंतुनाशक रसायनें फवारण्यांत येतात. त्यामुळें पोत्यांचे जमिनींतील ओलीपासून व किडीपासून रक्षण होतें. उंदीर व घुशी यांपासून मालाची खराबी होऊं नये म्हणून मधून मधून उंदरांचीं बिळें सायनो गॅस हा विषारी वायु आंत सोडून बुजविणें, उंदरांचे पिंजरे वापरणें व विषारी गोळ्या ठेवणें इत्यादि उपाय वेअरहाउसमन करतो. माल वेअरहाउसमनचे ताब्यांत आहे तोंपर्यंत त्यावर तो जागृकतेनें लक्ष ठेवतो. जर मालास कीड लागल्याचें आढळून आलें तर जंतुनाशक धुरीचा उपयोग करण्यांत येतो. अशा प्रकारें मालाची कीड, उंदीर-घूस, इत्यादिमुळें खराबी होऊं नये म्हणून सर्वतोपरीं काळजी घेतली जाते.

शेतीमालामध्यें असलेलें आर्द्रतेचें प्रमाण हंगामानंतर जास्त असतें. असा माल जर वखारींत ठेवला तर तो खराब होण्याची जास्त शक्यता असते. असा माल गरम होण्याचा संभव असतो. त्यावर बुरशी निर्माण होते व त्याला एक प्रकारचा उबट वास येतो. त्यावरील चमक जाऊन त्याचा रंगहि बदलूं लागतो आणि हळूहळू तो मनुष्यास खाण्यास अयोग्य होऊं लागतो. माल खराब होऊ नये म्हणून सर्वांत चांगला उपाय म्हणजे वखारींत माल सांठविण्यापूर्वी तो संपूर्णपणें वाळविला पाहिजे. मालांतील दमटपणामुळें त्याची खराबी होऊं नये म्हणून नियंत्रित वखारीसाठी निवडलेल्या गोडाऊनमध्यें भरपूर हवा खेळण्याची सोय असते. जमीन पक्की असते व त्यामध्यें कोठूनहि पाणी मुरत नाहीं. याबद्दल खात्री केलेली असते. जादा सुरक्षिततेसाठी जमिनींतील ओलीपासून माल खराब होऊ नये म्हणून जमिनीवर बांबूच्या चटया पसरलेल्या असतात. पोत्यांच्या थप्प्या भिंतीपासून अंतरावर लावल्या जातात व त्यांचा भिंतीशीं संपर्क होत नाहीं, याबद्दल खबरदारी घेण्यांत येते. त्यामुळें हवा खेळती राहते. वखारींत ठेवण्यासाठी आणलेला माल थोडाहि दमट असेल तर तो वाळवून आणण्यासाठी वेअरहाउसमन सूचना करतो.

पोत्यांच्या थप्प्या लावण्यापूर्वी गोदामामधील सर्व कोळीष्टकें काढून टाकण्यांत येतात व गोदाम चांगलें स्वच्छ करण्यांत येतें. जमिनीच्या अगर भिंतीच्या फटींत जर किडे दबा धरून बसले असतील तर त्यांचा नाश करण्यासाठी सर्वत्र गोदामांत पायेरो-क्लोराईल नामक जंतुनाशक औषध शिंपडण्यांत येतें. गोदाम हवाबंद करतां येण्यासारखें असल्यास जंतुनाशक धुरीचाहि उपयोग करण्यांत येतो. रिकाम्या गुदामांतील जंतू व किडे यांचा नाश करण्यासाठी जमिनीवर व भिंतीवर दर १०० चौरस फुटांस ४ औंस याप्रमाणें बी. एच्. सी. (शें. ५ टक्के) पावडर वापरण्यांत येते.

## विमा

माल वखारींत ठेवण्यासाठी आणल्याबरोबर त्याचा आग, चोरी व घरफोडी यांसाठी विमा उतरविण्याची व्यवस्था करण्यांत येते. मालाची बाजारांत असणाऱ्या किंमतीप्रमाणें होणाऱ्या एकूण किंमतीवर विमा उतरविला जातो. माल ठेवणारास विम्यासाठी स्वतंत्र आकार देण्याची जरूरी नाहीं. वखारीमध्यें माल ठेवण्यासाठी आकारण्यांत येणाऱ्या भाड्यांतच त्याचा समावेश होतो.

माल ठेवणाऱ्याची इच्छा असल्यास त्याच्या मालाचा पूर व दंगा यांमुळें होणाऱ्या संभाव्य नुकसानीबद्दल विमा उतरविला जातो. पण यासाठी लागणारा जादा खर्च माल ठेवणारानें द्याव-याचा असतो.

## वखारीच्या पावतीवर कर्ज मिळण्याची सोय

वखारींत माल ठेवल्यावर माल ठेवणारास त्याबद्दल ठरवून दिलेल्या छापील फार्मावर पावती मिळते. पावतीच्या मालकास जर कर्ज घेण्याची इच्छा असेल तर तिच्या तारणावर बँकेकडून कर्ज मिळूं शकतें. माल ठेवणारा वखारीमध्यें माल ठेवण्यासाठी प्रथमच आला असेल तर वेअरहाउसमन व्यक्तिशः त्याची बँकेच्या एजंटशीं ओळख करून देतो. माल ठेवणारा जर दुसऱ्या खेड्यांतून आला असेल तर त्याची पत ठेवण्यासाठी बँकेस लागणारी माहिती भरून देण्यास वेअरहाउसमन मदत करतो. या बाबतींत लागणारे कागद-पत्र म्हणजे ठेवीदाराच्या खेड्यांतील मालकीच्या जायदादीबद्दल माहिती, तलाठी किंवा इतर मुलकी अधिकाऱ्याकडून लागणारे जमिनीच्या खात्याचे उतारे, ओळखपत्र, ठेवीदार जर सहकारी पतपेढीचा सभासद असेल तर त्याविषयीं पतपेढीचे चेअरमन अगर सेक्रेटरी यांनीं द्यावयाची माहिती इ. बाबींबद्दल वेअरहाउस-मन माल ठेवणारास सल्लामसलत देतो. त्यामुळें बँकांना ठेवीदारा-विषयींचें मत व ठेवीदाराची पत ठरविण्यास मदत होते व त्याला त्वरित कर्ज मिळूं शकतें. या सर्व गोष्टी पहिल्या खेपेसच कराव्या लागतात. वळण पडल्यानंतर काम सुरळीत चालतें. स्थानिक माल ठेवीदारांची यादी करून त्यांपैकी कोणास कर्ज द्यावयाचें आहे या-बाबतची चौकशी करून ती माहिती वेअरहाउसमन स्टेट बँकेच्या एजंटांना पुरवतो. अशारीतीनें स्टेट बँकेच्या एजंटांना कर्ज घेणाऱ्या व्यक्तीची अगोदरच माहिती मिळाल्यामुळें त्यांना कर्ज देण्यास अडचण वाटत नाहीं.

वखारीच्या पावतीचा विशेष म्हणजे तिच्या तारणावर मालाच्या किंमतीच्या ६० ते ७५ टक्के कर्ज मिळूं शकतें. वखारीचे पावतीवर देण्यांत येणाऱ्या कर्जाचा दर स्टेट बँक ऑफ इंडियानें ५ टक्के ठरविला आहे. स्टेट बँक ऑफ हैद्राबादनें तो ५॥ टक्के ठरविला आहे. शेतकऱ्यांना सहकारी पतपेढीचे नाममात्र सभासद झाल्यावर कर्ज मिळूं शकतें. शेतकऱ्यांना इतर मार्गांनें कर्ज मिळण्यासाठी ९ ते १२ टक्के व्याज द्यावें लागतें. कमी व्याजानें व सुलभ रीत्या कर्ज मिळण्याची सोय हा वखारीच्या पावतीचा महत्त्वाचा फायदा आहे. वेअरहाउसमन माल ठेवणारांना बँकेशीं ओळख करून देत असल्यानें बँकेचेंहि काम सुलभ होतें.

बँकेनें वखारीच्या पावतीवर कर्ज दिल्याबरोबर त्याची नोंद करण्यासाठी वेअरहाउसमनला बँकेकडून सूचना मिळते.

वेअरहाऊसमन वखारीच्या पावतीच्या त्याचेजवळ असलेल्या प्रतीवर व माल ठेवणाऱ्याच्या नांवानें कार्डावर या नोंदी करतो व बँकेकडून पुन्हा सूचना आल्याशिवाय माल ठेवणाऱ्यास त्याचा माल परत देत नाहीं. बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या कांहीं भागाची फेड करून त्या प्रमाणांत ठेवलेल्या मालाचा कांहीं भाग सोडवून घेता येतो. अंशतः माल वखारींत सोडवून घेतला असेल तर त्या-प्रमाणें वखारीच्या पावतीच्या मूळ प्रतीवर तसेंच वेअरहाउसमन जवळ असलेल्या प्रतीवर आणि माल ठेवणाऱ्याचे नांवाचे कार्डावर त्याची नोंद होते. यासाठी वेअरहाउसमन बँकेमध्यें प्रत्यक्ष चौकशी करून नंतर नोंदी करतो. कधीं कधीं बँकाहि त्यांचीं माणसें पाठवून नोंदी करवून घेतात.

## उपसंहार

शास्त्रशुद्ध पद्धतीनें शेतीमालाची सांठवण केल्यामुळें त्याची किडे, उंदीर, घूस, हवेंतील दमटपणा इ. मुळें होणारी खराबी कमी करणें हें नियंत्रित वखारीचें मुख्य कार्य आहे. माल सांठविलेल्या मुदतींत तो खराब होत नाहीं याची नियंत्रित वखारीबद्दल खात्री असते, आणि शेतकऱ्यास त्याच्या मालाचा संपूर्ण मोबदला मिळू शकतो. वखारीच्या पावतींत उल्लेख केल्याप्रमाणें मालाचें वजन व प्रतवारी आहे याबद्दल बँकांनाहि निर्धास्त राहतां येतें. शिवाय बँकांना मालाच्या सुरक्षिततेविषयीं हमी वाटते. मालाचा आग व चोरी याबद्दल विमा उतरविलेला असल्यानें माल ठेवणारा व बँक यांचे हितसंबंध सुरक्षित असतात. या सर्व बाबींमुळें शेतकऱ्यांना चांगला भाव येईपर्यंत माल ठेवण्यासाठी व बँकांना कर्ज देण्यासाठी अनुकूल परिस्थिति तयार होते. अर्थातच या सर्वांचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याच्या पद्धतीचा पाया भक्कम होऊन शेतीमालाच्या किंमतीस स्थैर्य येतें. या योजनेमुळें सुगीनंतर बाजारांत येणारी मंदी टाळतां येईल. बाजारांत येणाऱ्या मालाचा प्रवाह नियंत्रित करतां येऊन किंमतींत होणारा अनैसर्गिक व अनिश्चित बदल टाळतां येईल. वखारीची पावती दुसऱ्याच्या नांवें करून देतां येण्याजोगा दस्तऐवज आहे व तसा तो प्रचारांत आणणें सोपें होईल. खरीददारांना पावतीमध्यें उल्लेख केल्याप्रमाणें मालाच्या दर्जाची खात्री असल्यानें मालाचा नमुना पाहून होणाऱ्या खरेदीविक्रीच्या व्यवहारांतील धोके नष्ट करतां येतील. वखार वाहतुकीवर होणारा खर्चहि कमी होईल.

## खरेदी-विक्रीचा एक महत्त्वाचा दुवा

१९५९-६० सालीं महाराष्ट्र राज्य वखारसंघाजवळ १,११,००० पोतीं सांठविण्याची सोय असलेल्या वखारी होत्या. त्यांपैकीं शें. ७८ टक्के जागा प्रत्यक्षांत उपयोगांत आणली गेली. कांहीं बाजारपेठांत तर जागेच्या अभावीं ठेवण्यासाठी आणलेला माल नाइलाजानें नाकारावा लागला. या वर्षांत पोतीं ठेवण्याच्या एकूण सोयींमध्यें साडेतीन पटीनें वाढ करण्यांत येईल. समाजांतील सर्व वर्गांकडून या सोयीचा फायदा घेतला जाईल अशी संघाला अपेक्षा आहे. माल वखारींत ठेवण्यासाठी आणणाऱ्या ग्राहकांत संघ कोणत्याहि प्रकारचा भेदभाव करीत नाहीं.

नियंत्रित वखारी, त्यापासून मिळणाऱ्या सोयींमुळें आणि त्यामध्यें शास्त्रीय पद्धतीनें माल ठेवला जात असल्यानें शेती-मालाच्या खरेदीविक्रीमध्यें एक महत्त्वाचा दुवा होऊ पाहात

आहेत. शास्त्रशुद्ध पद्धतीनें माल ठेवण्यानें होणारें नुकसान टळूं शकेल. याशिवाय कमी खर्चांत व सहज रीतीनें कर्ज मिळण्याची सोय झाल्यामुळें धारणाशक्ति वाढून मालास चांगली किंमत मिळूं शकेल. संघाच्या गेल्या दोन वर्षांच्या कारकीर्दींत बऱ्याच शेतकऱ्यांनीं या सोयीचा लाभ करून घेतला असून त्यांना मालाची किंमतहि चांगली मिळाली. मालासाठी मिळालेली ही जादा किंमत माल ठेवण्यासाठी येणाऱ्या खर्चाहून पुष्कळच जास्त आहे. निव्वळ खराब होणाऱ्या मालाची किंमत माल ठेवण्यासाठी येणाऱ्या खर्चाहून जादा होते.

## आणखी कांहीं वस्तूंविषयीं आयात धोरण जाहीर

एक ऑक्टोबर, १९६० रोजीं भारत सरकारनें वर्षाधीचें धोरण जाहीर केलें त्या वेळीं एकूण २० वस्तूंपैकी १२ वस्तूंसंबंधींचें धोरण जाहीर केलें नव्हतें. या बारा वस्तूंसंबंधींचें धोरण काल रोजीं येथें जाहीर करण्यांत आलें आहे.

मशीन टूल्स, शस्त्रक्रियेचीं उपकरणीं व साधनें, शेतकी ट्रॅक्टर, घड्याळें, फोटोग्राफिक निगेटिव्हिज व कागद, छपाईचा कागद, पॅकिंग व रॅपिंगचा कागद, जायंट मोटार, मोटार सायकल व सायकलींचे टायर व ट्यूब्ज, पैलू पाडलेले व न पाडलेले हिरे, इत्यादि वस्तूंचा यांत समावेश होतो.

मशीन टूल्सचे बाबतींत प्रस्थापित आयातदारांचा आयात कोटा ३० टक्के जनरल व ३० टक्के सॉफ्टवरून २० टक्के जनरल व २० टक्के सॉफ्टवर आणण्यांत आला आहे. शस्त्रक्रियेचीं उपकरणीं व साधनांचे बाबतींत आयात कोट्यांत बदल करण्यांत आला नसला तरी गेल्या वर्षाधींत देण्यांत आलेली पूरक परवान्याची सवलत काढून घेण्यांत आली आहे. ट्रॅक्टरांचे बाबतींत ऑक्टोबर १९६० ते मार्च १९६१ या वर्षाधींसाठी आयात कोट्याची तरतूद करण्यांत आलेली नाहीं.

तयार घड्याळांचे बाबतींत आयात कोटा निम्मा म्हणजे ५ टक्के जनरल व ५ टक्के सॉफ्टवर आणण्यांत आला आहे तर फोटोग्राफिक निगेटिव्हिज व कागद (एक्स–रे फिल्म वगळून) ही घट ३३⅓ टक्के जनरल व ३३⅓ टक्के सॉफ्टवरून २५ टक्के जनरल २५ टक्के सॉफ्टवर आणण्यांत आली आहे. छपाईच्या कागदाचे बाबतींत आयात कोटा १२½ टक्क्यांवरून ७½ टक्क्यांवर तर पॅकिंग व रॅपिंग कागदाचे बाबतींत ७½ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आणण्यांत आला आहे. फिल्टर पेपरचे बाबतींत कोठलाच बदल करण्यांत आलेला नाहीं. खास नमूद न केलेला कागद वगळून कागदाचे बाबतींत आयात कोटा गेल्या वर्षाधींएवढाच ठेवण्यांत आला असला तरी गेल्या वर्षाधींत देण्यांत आलेले जादा परवाने आतां देण्यांत येणार नाहींत.

जायंट मोटर, मोटर सायकल व सायकल यांचे टायर व ट्यूब्ज, फ्लॅट्स व सॉलिड टायर यांचे आयात कोटे मागील वर्षाधींइतकेच म्हणजे ७५ टक्के आहेत. तथापि हे परवाने सायकलींचे टायर व ट्यूब्ज यांच्या आयातीसाठी चालणार नाहींत. पैलू पाडलेल्या व न पाडलेल्या हिऱ्यांचे बाबतींत औद्योगिक कामांत वापरले जाणारे हिरे वगळतां आयात कोटा १० टक्क्यांवरून ० वर आणण्यांत आला आहे.

कार्ड क्लोदिंग व कार्ड ॲक्सेसरीजचे आयात कोटे पूर्वीप्रमाणेच म्हणजे ६६⅔ टक्के जनरल व ६६⅔ टक्के सॉफ्ट याप्रमाणें राहतील.

## चांदा येथें बिडाच्या लोखंडाचा कारखाना

महाराष्ट्र राज्य सरकारच्या भूगर्भ व खाणीखात्याच्या माहितीप्रमाणें महाराष्ट्रांत चांद्याच्या आसपास कोळशाचे नवे साठे उपलब्ध होत आहेत. ह्या कोळशाचा उपयोग लोखंडाच्या खनिजापासून बिडाचें लोखंड तयार करण्यासाठी करतां येईल. मात्र त्यासाठी लोखंड तयार करण्याच्या आधुनिक पद्धतीचा उपयोग करावा लागेल. भारताचें औद्योगीकरण झपाट्यानें साधण्याच्या कामांत लोखंड–पोलादाचे मोठे कारखाने मदत करीत आहेतच. परंतु, स्थानिक साधन-सामुग्रीचा उपयोग करून लोखंडाचे छोटे कारखाने काढण्याचे भारत-सरकारनें ठरविलें आहे. अशाच प्रकारचा एक कारखाना विदर्भांतील चांदा येथें काढण्यास मध्यवर्ती सरकारनें अनुमति दिली आहे. हा संकल्पित कारखाना खाजगी मालकीच्या विभागांतील असेल. मुंबई येथील हिंद ट्रेडर्स ही कंपनी कारखाना उभारणार असून त्यांत दरसाल १ लाख टन बिडाचे लोखंड निर्माण करण्यांत येईल. कारखाना स्थापन करण्यासाठी १० कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामग्री आणि तांत्रिक मदत पूर्व-जर्मनीचें सरकार पुरविणार आहे. कमी प्रतीच्या कोळशापासून भट्टीला लागणारा कोळसा तयार करण्याची एक पद्धत पूर्व-जर्मनींत उपलब्ध आहे. ह्या पद्धतीचा उपयोग करून पूर्व-जर्मनींत दरसाल ३ लाख टन बिडाचें लोखंड तयार करण्यांत येतें. हीच पद्धत चांदा येथील कारखान्यांत वापरण्यांत येणार आहे. चांदा येथें हा कारखाना उभारला गेल्यावर त्याच्या अनुषंगानें ओतकामाचे, यांत्रिक हत्यारांचे व इतर कारखाने निघण्यास अनुकूल वातावरण निर्माण होणार आहे. त्याचा फायदा घेण्यावर पुढील प्रगति अवलंबून आहे.

## बँक ऑफ इंदोरच्या भागधारकांना नुकसानभरपाई

सन १९५९ च्या स्टेट बँक ऑफ इंडिया (सब्सिडिअरी बँक्स) ॲक्टांतील तरतुदीनुसार बँक ऑफ इंदोर लि. च्या नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असलेल्या भागधारकांना नुकसानभरपाईच्या रकमेबाबत न्यायमंडळाकडे बाजू मांडावयाची असेल तर ते विनंती–अर्ज भारत सरकारनें सदर कायद्यांतील १३ (३) कलमान्वयें २८ डिसेंबर, १९६० पर्यंत पाठविण्यासंबंधींचा हुकूम काढला आहे, असें मध्यवर्ती अर्थखात्यानें नुकत्याच काढलेल्या एका प्रसिद्धिपत्रकांत म्हटलें आहे. अशी विनंती करावयाची असल्यास तसे अर्ज ठराविक फॉर्ममध्यें सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, डिपार्टमेंट ऑफ एकॉनॉमिक अफेअर्स, स्टेट बँक्स सेक्शन, नवी दिल्ली, यांचकडे पाठवावेत. सदर फॉर्मच्या प्रती स्टेट बँक ऑफ इंदोरच्या मुख्य कचेरीकडून मागवाव्यात.

## मोटार सायकली व स्कूटर यांचें उत्पादन

यंदा सप्टेंबर अखेरीपर्यंत देशांत १२,२३३ मोटार सायकली आणि स्कूटर तयार झाल्या. दुसऱ्या योजनेंत हेंच लक्ष्य प्रतिवर्षी ११,००० आहे. देशांत यांच्या उत्पादनास १९५५ मध्यें प्रारंभ झाला आणि १९५६ मध्यें, १०४२ मोटार सायकली आणि ४७३५ स्कूटर तयार करण्यांत आल्या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत प्रतिवर्षी २४,००० मोटार सायकली आणि स्कूटर तयार होऊं लागतील. या दोन धंद्यांसाठीं वेगळी आर्थिक तरतूद केलेली नाहीं. या धंद्यांत अंदाजें २·३४ कोटी रुपये भांडवल गुंतविण्यांत आलेलें आहे.

## भारतांतील नागरी विमान वाहतूक १९६० च्या पूर्वार्धांत झालेली प्रगति

### बोइंग विमानांनीं वाहतूक

एअर इंडिया इंटरनॅशनलच्या भारत–इंग्लंड वाहतूक व्यवस्थेचा न्यूयॉर्कपर्यंत विस्तार व इंग्लंड आणि अमेरिकेकडे सुरू झालेली बोइंग विमानांची वाहतूक, या भारतांतील नागरी विमान वाहतुकीच्या क्षेत्रांत दि. ३० जून, १९६० ला संपलेल्या वर्षार्धांतील प्रगतींतील ठळक बाबी होत.

पुनर्विलोकनाच्या या काळांत, एअर इंडिया इंटरनॅशनलनें ३ बोइंग (७०७ जेट) विमानें मिळविलीं. युरोप व अमेरिकेकडे या कॉर्पोरेशनकडून होणाऱ्या वाहतुकींत बोइंग विमानांचा उपयोग प्रथमतः दि. १९ एप्रिल, १९६० रोजीं सुरू झाला. दि. १४ मे, १९६० पर्यंत लंडनकडे होणाऱ्या साप्ताहिक वाहतुकींपैकी ४ वेळची वाहतूक बोइंगनीं होऊं लागली. १४ मे, १९६० नंतर आठवड्यांतून २ वेळां ही व्यवस्था न्यूयॉर्कपर्यंत वाढविण्यांत आली. अशा रीतीनें भारतांत इंग्लंड–न्यूयॉर्ककडील वाहतुकीसाठी बोइंगचा वापर करण्याचा कार्यक्रम अंमलांत आला आहे.

### उतारू वाहतुकींत वाढ

पुनर्विलोकनाच्या या काळांत, एअर इंडिया इंटरनॅशनलच्या शेड्यूल्ड सर्व्हिसेकडून ४४,८१४ उतारू, १४,५९,५७२ किलोग्रॅम माल आणि ३,७७,६९० किलोग्रॅम टपालाची वाहतूक झाली. १९५९ चे हेच आंकडे अनुक्रमें ४४,३३३ उतारू, ११,६९,०६२ किलोग्रॅम माल व ४,७३,००८ किलोग्रॅम टपाल असें होतें, तर १९५९ च्या उत्तरार्धांत ४७,१६३ उतारू १४,५८,५९९ किलोग्रॅम माल आणि ४,३५,८०९ किलोग्रॅम टपालाची वाहतूक झाली होती. यावरून १९६० च्या पूर्वार्धांतील वाहतुकींत १९५९ च्या उत्तरार्धापेक्षा घट झाली असल्याचें दिसून येतें. एअर इंडिया इंटरनॅशनलच्या नोकरवर्गानें ८ ते १६ जानेवारी, १९६० पर्यंत केलेला संप त्यास कारणीभूत आहे.

### इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनची प्रगति

याच काळांत इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या शेड्यूल्ड सर्व्हिसेसनीं ३,७२,३१७ उतारू, १,६६,७१,२०८ किलोग्रॅम माल व २९,३८,९७२ किलोग्रॅम टपालाची वाहतूक केली. १९५९ चे हेच आंकडे अनुक्रमें ३,२७,६८५ उतारू, १,५८,८४,६७४ किलोग्रॅम माल आणि २९,१९,५२६ किलोग्रॅम टपाल असें होतें. १९५९ च्या उत्तरार्धाची ही आंकडेवारी ३,१६,९७९ उतारू, १,४९,९१,७६१ किलोग्रॅम माल आणि २९,८६,७०४ किलोग्रॅम टपाल असें होतें.

### रात्रीची हवाई टपाल वाहतूक व्यवस्था

१९६० ज्या या पूर्वार्धांत रात्रीच्या हवाई टपाल वाहतूक व्यवस्थेनुसार २४,९५९ उतारू, ८,३९,२५६ किलोग्रॅम माल आणि ९,२४,०५१ किलोग्रॅम टपालाची वाहतूक करण्यांत आली. १९५९ चे हे आंकडे २२,६४३ उतारू, ७,०४,८२२ किलोग्रॅम माल आणि ९,७६,२३२ किलोग्रॅम टपाल असें होतें, तर १९५९ च्या उत्तरार्धाचे हे आंकडे २१,६५९ उतारू, ७,८९,४६० किलोग्रॅम माल आणि ९,३४,७०४ किलोग्रॅम टपाल असे आहेत.

### नॉन–शेड्यूल्ड सर्व्हिसेस

या काळांत इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या नॉन–शेड्यूल्ड सर्व्हिसकडून ४८,९५७ उतारू, १,७०,९७,२६२ किलोग्रॅम मालाची वाहतूक झाली. १९५९ चे सर्व्हिसेसचे हेच आंकडे ४०,५९९ उतारू व १,६८,४८,९४२ किलोग्रॅम माल असें होतें. तर १९५९ च्या उत्तरार्धांत हे आंकडे ४८,२७८ उतारू व १,९९,५२,४२६ किलोग्रॅम माल असे आहेत.

### ८५ विमानतळांवर नियंत्रण

जून, १९६० अखेर नागरी विमान वाहतूक खात्याच्या नियंत्रणाखाली देशांतील ८५ विमानतळ होते. पुनर्विलोकनाच्या या कालावधींत बेहला (प. बंगाल), रक्झॉल व जोगबानी (बिहार) येथें मिळून ३ नवीन विमानतळ बांधण्यास सुरुवात झाली असून फुलबाग (उत्तर प्रदेश) व तुलिहाल (मणिपूर) येथील विमानतळ जवळजवळ बांधून झाले आहेत.

### सांताक्रूझ विमानतळाच्या विकासासाठी ४ कोटी रु.

जेट विमान वाहतूक सोयीची व्हावी म्हणून मुंबई (सांताक्रूझ), कलकत्ता (डमडम) व दिल्ली (पालम) येथील तीन आंतरराष्ट्रीय विमानतळांचा मोठ्या प्रमाणावर विकास करण्यांत येत आहे. सांताक्रूझ विमानतळाच्या विकासाकरितां ४ कोटी रु. खर्चाची एक योजना कार्यान्वित होत आहे.

### १२ उमेदवारांचें शिक्षण पूर्ण

पुनर्विलोकनाच्या या काळांत अलाहाबाद येथील सिव्हिल एव्हिएशन ट्रेनिंग सेंटरवरील फ्लाइंग स्कूलमध्यें ३२ उमेदवारांचें विमानोड्डाणाचें शिक्षण पूर्ण झालें, तर एरोड्रोम स्कूलमध्यें ३९ एरोड्रोम ऑपरेटर, १२ असिस्टंट एरोड्रोम ऑफिसर व ४० फायर सर्व्हिस परसोनलचा उजळणीवर्ग घेण्यांत आला. त्याचप्रमाणें तेथील कम्युनिकेशन स्कूलमध्यें सुमारें ७० उमेदवारांचें निरनिराळ्या तांत्रिक विभागांचें शिक्षण पूर्ण झालें. जून १९६० अखेर ९३ उमेदवारांचें निरनिराळ्या विषयांचें शिक्षण चालू होतें.

### फ्लाइंग व ग्लाइडिंग क्लब

जून १९६० अखेर मुंबई, बडोदें व इतर शहरांतील मिळून सरकार सहाय्यित असे १७ फ्लाइंग क्लब तर अलाहाबाद, बंगळूर व पुणें येथें मिळून ३ ग्लाइडिंग क्लब चालू होते. याच काळांत रजिस्ट्रेशन सर्टिफिकिटें घेतलेल्या विमानांची संख्या ५२४, 'ए' लायसेन्स असलेल्या वैमानिकांची संख्या १२४८, 'बी' लायसेन्स असलेल्या वैमानिकांची संख्या ५८५ होती तर 'ए–१' लायसेन्स असलेला वैमानिक एकच होता. याच काळांत २० विमान अपघात घडून आले.

नागरी विमान वाहतूक व्यवस्थेच्या विकासाकरितां या काळांत परदेशांशीं करार करण्यांत आले असून संशोधन कार्यांतहि समाधानकारक प्रगति होत आहे.

---

**अमेरिका–चीन व्यापार**—अमेरिकेचे नवे अध्यक्ष मि. जॉन केनेडी चीन व अमेरिका ह्यांच्यामधील व्यापारावर सध्यां असलेले निर्बंध रद्द करणार असल्याची वार्ता आहे. निर्बंध रद्द झाल्यास व्यापार एकदम वाढण्यासारखा नसला तरी त्यामुळें उभयतांचे राजकीय संबंध सुधारण्यास बरीच मदत होण्याची शक्यता आहे.

**कुटुंबनियोजनाचीं केंद्रें**—आग्रा शहरापासून १५ मैलांवरील एका खेड्यांत मध्यवर्ती सरकारचे आरोग्यमंत्री श्री. करमरकर ह्यांनीं कुटुंबनियोजन केंद्राचें उद्घाटन केलें. ह्याप्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं प्रत्येक खेड्यांतून असें केंद्र स्थापन करण्याचा सरकारचा विचार आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८११ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.